अधिसूचना

क्रमांक : ३२ /२०२०. दिनांक : ५.३.२०२०

विषय :- कै. ॲड.रामकृष्णजी राठी विधी महाविद्यालय, वाशिम,(७२०) ता.जि.वाशिम, येथील एल.एल.बी.-५ वर्षीय हा अभ्यासक्रम बंद करण्याबाबत é

सर्व संबंधीतांचे माहीतीकरीता सुचित करण्यात येते की, कै. ॲड.रामकृष्णजी राठी विधी महाविद्यालय, वाशिम,(७२०) ता.जि.वाशिम, या महाविद्यालयातील एल.एल.बी.-५ वर्षीय हा अभ्यासक्रम बंद करण्यासंदर्भात तत्कालीन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ मधील कलम १२१ च्या तरतुदीनुसार विद्या परिषद व व्यवस्थापन परिषद सभेने मान्यता दिल्यानुसार सदर अभ्यासक्रम बंद करण्याचे मान्यतेकरीता प्रस्ताव शासनास पाठविण्यात आला होता.

महाराष्ट्र शासनाने शासन आदेश क्र. संकीर्ण -२०१९/(१७६/१९)/मशि-४, दि. ०६ नोव्हेंबर,२०१९ अन्वये खालील तक्त्यात नमुद महाविद्यालयातील, एल.एल.बी.-५ वर्षीय हा अभ्यासक्रम शैक्षणिक वर्ष २०१९-२०२० पासुन टप्प्या टप्प्याने बंद करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. त्यानुसार महाराष्ट्र विद्यापीठे कायदा, २०१६ मधील कलम १२१ च्या तरतुदीनुसार बंद करण्यात येत आहे.

आदेशान्वये.

अ.क्र.	संस्थेचे नांव	महाविद्यालयाचे नांव व सांकेतिक क्रमांक	महाविद्यालयातील अभ्यासक्रम
१.	२.	३.	४.
१.	राजस्थान एज्युकेशन सोसायटी, वाशिम. ता.जि. वाशिम.	कै. ॲड.रामकृष्णजी राठी विधी महाविद्यालय, वाशिम,(७२०) ता.जि.वाशिम.	एल.एल.बी.-५ वर्षीय

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

*****

परिपत्रक क्र. १/२०२०

क्र. १/२०२० दि. ५.३.२०२०

विषयः संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालय व शैक्षणिक विभागांना परिषदा / कार्यशाळा / चर्चासत्र / परिसंवाद आयोजनाकरिता विद्यापीठ साधारण निधी मधुन आर्थिक सहाय्य

संदर्भः (१) विद्यापीठ परिपत्रक क्र. १४२/२००४,दि.५.११.२००४
(२) विद्यापीठ अधिसुचना क्र. ११७/२०१६ दि. ८.१२.२०१६

(१) सर्व संबंधिताच्या माहितीकरिता कळविण्यात येते की, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या संलग्नित महाविद्यालय व शैक्षणिक विभागांना परिषदा / कार्यशाळा / चर्चासत्र / परिसंवाद आयोजनाकरिता विद्यापीठ साधारण निधी मधुन आर्थिक सहाय्य देण्याबाबत विहीत प्रपत्राचा नमुना व इतर बाबीसंदर्भात परिपत्रक क्र.१४२ दि. ५.११.२००४ अन्वये प्रसिध्द करण्यात आले आहे. त्यामध्ये महत्वेकरुन नमुद असलेली बाब खालीलप्रमाणे आहे.

"विद्यापीठाच्या साधारण निधीमधून परिषदा/ चर्चासत्र / परिसंवाद आयोजनाकरिता अर्थसहाय्याची मागणी करण्याकरिता महाविद्यालय तसेच विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांनी अर्ज सादर करण्याच्या दोन तारखा निश्चित करुन, त्या ३१ ऑगष्ट व ३१ डिसेंबर राहील. "

(२) संत गाडगे बाबा अमरावती विद्यपीठाच्या सर्व शैक्षणिक विभागामध्ये व विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयामध्ये आयोजित करण्यात येत असलेल्या आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय/राज्य/विभागीय स्तरावरील परिषदा/ कार्यशाळा/चर्चासत्र/परिसंवाद आयोजनाकरिता विद्यापीठ साधारण निधी मधुन अनुक्रमे रु.५०,०००/-, ३०,०००/-, २०,०००/-, १०,०००/- चे आर्थिक सहाय्य मंजुर करण्यात येत असते. याबाबत अधिसुचना क्र. ११७/२०१६, दि.८.१२.२०१६ अन्वये विद्यापीठ राजपत्र भाग-२ मध्ये प्रकाशित करण्यात आले आहे.

(३) उपरोक्त परिच्छेद क्र. १ व २ मध्ये नमुद दस्तऐवज विद्यापीठ संकेतस्थळावर (www.sgbau.ac.in) उपलब्ध आहे.

(४) संलग्नित महाविद्यालय तसेच शैक्षणिक विभागांनी विद्यापीठ साधारण निधी मधुन अर्थसहाय्याची मागणी करीत असतांना विहीत तरतुदी अंतर्गत विहीत प्रपत्रामध्ये व उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे निश्चित केलेल्या तारखापुर्वी विद्यापीठाकडे आवश्यक त्या सहपत्रासह अर्ज सादर करण्यात यावे.

स्वा/-
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ